**जिल्हा कोल्हापूर होमगार्ड नोंदणी -२०२४**

## अधिसुचना - कोल्हापूर जिल्हा होमगार्ड नोंदणी कार्यक्रम वेळापत्रक

कोल्हापूर जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी करीता कोल्हापूर जिल्हयातील ज्या रहीवासी उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केला आहे त्यांचेकरीता खालील प्रमाणे नोंदणी कार्यक्रम आयोजित केलेला आहे. **सदर नोंदणी फक्त कोल्हापूर जिल्हयातील रहीवासी उमेदवारांकरीता असुन इतर जिल्हयातील ऑनलाईन अर्ज केलेले सर्व उमेदवार सदर नोंदणी करीता अपात्र आहेत. त्यामुळे कोल्हापूर जिल्हा सोडुन इतर जिल्हयातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमाकरीता उपस्थित राहु नये. त्यांना मैदानामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच रहिवासी भागातील पथक/उपपथक सोडुन इतर पथकात अर्ज केलेले उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणी मध्ये अपात्र ठरतील.**

अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणी, शारीरिक पात्रता व क्षमता चाचणी याकरीता मा. पोलीस अधिक्षक कोल्हापूर यांनी दि. २४.०९.२०२४ ते दि. २६.०९.२०२४ हा कालावधी त्यांचे पत्र क्रं. आशा-प्रलि/होमगार्ड भरती/मैदानी चाचणी बंदोबस्त - साधन सामुग्री/२०२४/१३७०१,कोल्हापूर दि.१२/०९/२०२४ नुसार निश्चित केलेला आहे तरी नियोजित कालावधीत खालील तक्त्यात नमुद अर्ज नोंदणी क्रमांकातील उमेदवारांनी दररोज सकाळी ०६.०० वाजता खालीलप्रमाणे **पोलीस मुख्यालय, कवायत मैदान, कोल्हापूर** येथे संपुर्ण नोंदणी प्रक्रियेकरिता बोलविण्यात येत आहे, केवळ तक्त्यात नमुद असलेलेच अर्ज नोंदणी क्रमांकातील संख्येतील **उमेदवारांना सकाळी ०६.०० ते सकाळी १०.३० या कालावधीमध्येच मैदानात प्रवेश दिला जाईल याची नोंद घेण्यात यावी.**

| अ.क्रं. | दिनांक | बोलविण्यात आलेले अर्ज नोंदणी क्रं. | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| १. | 24.09.2024 | अर्ज नोंदणी क्रं. 8 ते 9746 सर्व महिला | 1163 |
| | 24.09.2024 | अर्ज नोंदणी क्रं. 1 ते क्रं. 2410 | 2137 |
| २. | 25.09.2024 | अर्ज नोंदणी क्र. 2411 ते क्रं. 6141 | 3300 |
| ३. | 26.09.2024 | अर्ज नोंदणी क्र. 6143 ते क्रं. 9747 | 3219 |

१. कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करीता येताना अर्जासह आवश्यक कागदपत्रांच्या उमेदवारांनी स्वत: स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रति अर्जासोबत जोडावी. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वत: घेवुन यावे. चार पासपोर्ट साईज कलर फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील. उमेदवारांना नोंदणीकरीता स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. "नियोजित तारखेस काही अपरिहार्य कारणास्तव बदल झाल्यास त्याबाबत पुढील तारीख त्या-त्या उमेदवारांना कळविण्यात येईल." उमेदवारांना वरील नमुद वेळेत नोंदणी प्रक्रियेकरिता उपस्थित राहणे बंधनकारक आहे. नमुद वेळेनंतर उपस्थित राहणा-या उमेदवारांना नोंदणी प्रक्रियेकरिता प्रवेश दिला जाणार नाही. (जे वरील परिच्छेदात नमुद केले आहे त्याप्रमाणे)

२. उमेदवारांना शारिरिक क्षमता चाचणी मध्ये पात्र होणेकरीता प्रत्येक प्रकारामध्ये ४०% गुण मिळविणे आवश्यक राहील. **(धावणे या प्रकारात महिला उमेदवारास किमान १० गुण, पुरुष उमेदवारांस किमान ८ गुण व गोळाफेक या प्रकारात किमान ४ गुण दोन्ही प्रवर्गाकरिता आवश्यक.) धावणे चाचणी प्रकारामध्ये अपात्र ठरल्यास गोळाफेक चाचणी घेतली जाणार नाही. मात्र धावणे चाचणीमधील अपात्र उमेदवारांना त्यांचे डिटेल सोबत शेवटपर्यंत थांबावे लागेल व चेस्ट क्रमांक, टोकन इ. जमा करावे लागेल. मध्येच पळुन गेलेल्या उमेदवारांवर दंडात्मक कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.**

३. उमेदवारांनी कोणत्या किमती वस्तु, मोबाईल इ. आणु नयेत आणि आणल्या तर त्या स्वत:चे जबाबदारीवर सांभाळाव्यात. याची कोणतीही जबाबदारी आयोजकांवर राहणार नाही.

४. पथक निहाय रिक्त अनुशेष खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | होमगार्डपथक/उपपथक | रिक्त जागा | | अंतर्गत पोलीस ठाणे |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला | |
| १. | कोल्हापूर शहर | ४६ | ९ | राजवाडा,लक्ष्मीपुरी,शाहुपुरी,राजारामपुरी |
| २. | करवीर | ३३ | ४ | करवीर,गोकुळ शिरगांव,गांधीनगर,इस्पुर्ली |
| ३. | गडहिंग्लज | ६ | ० | गडहिंग्लज |
| ४. | राधानगरी | ८ | १ | राधानगरी |
| ५ | गारगोटी | ३ | ३ | भुदरगड |
| ६. | शिरोळ | १० | १ | शिरोळ |
| ७ | शाहुवाडी | १४ | ० | शाहुवाडी |
| ८ | हातकणंगले | ८ | ० | हातकणंगले |
| ९ | आजरा | १६ | ० | आजरा |
| १० | पन्हाळा | २२ | १ | पन्हाळा |
| ११ | कागल | २० | ० | कागल |
| १२ | चंदगड | २५ | १ | चंदगड |
| १३ | यवलुज | ८ | ० | लक्ष्मीपुरी |
| १४ | सोळांकुर | ५ | ० | राधानगरी |
| १५ | कळे | २ | १ | कळे,गगनबावडा |
| १६ | इचलकरंजी | ३१ | २ | इचलकरंजी, शहापुर, शिवाजीनगर |
| १७ | हुपरी | ८ | ० | हुपरी |
| १८ | वडगांव | ६ | ० | वडगांव |
| १९ | कुरुंदवाड | ११ | १ | कुरुंदवाड |
| २० | जयसिंगपुर | १६ | १ | जयसिंगपुर |
| २१ | रुकडी | ४ | ० | शिरोली MIDC |
| २२ | कोडोली | ३ | ० | कोडोली |
| २३ | मुरगुड | ३ | ० | मुरगुड |
| २४ | हलकर्णी | ५० | ० | नेसरी |
| | **एकुण** | ३५८ | २५ | |

सदर होमगार्ड नोंदणी प्रक्रीया अत्यंत पारदर्शक व इन-कॅमेरा पार पाडणेत येणार असुन होमगार्ड नोंदणी करीता उमेदवारांनी कोणत्याही अमिषाला बळी पडु नये. तसेच शिफारस / वशिला इ. गैरमार्गाचा वापर करु नये. होमगार्ड नोंदणी करीता कोणी पैसे / लाचेची मागणी केल्यास तात्काळ मा. अपर पोलीस अधिक्षक, कोल्हापूर किंवा अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे तक्रार करावी.

अतिवृष्टीमुळे वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याची सुचना https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेतस्थळावरील सुचनांकरीता अदयावत रहावे.

(जयश्री देसाई)
जिल्हा समादेशक, होमगार्ड
तथा अपर पोलीस अधिक्षक, कोल्हापूर